घराच्या अंगणात
चिमण्या येतात
मनात घर करतात
काही उडून जातात ।१
चिवचिव करणाऱ्या
चिमण्यांचे आर्त बोल
घुमत राहतात सदा
मनाच्या कुडीतदेखील ।२
गच्चीतल्या कुंडीतल्या
मुळांशी त्यांची खुडबुड
जगण्याचे मूळ सर्व
शोधण्याची धडपड ।३
घराच्या अंगणामध्ये
गुरांची वर्दळ
मिळे का चारा-पाणी
मनातली तळमळ ।४
अर्थ नच कळे त्यांना
मारतात उगा लोक
गुरे हंबरती किती
त्यांची अधुरीच भूक
चारा कुठे मिळतो
मनात काहुरते भीती
परी उरातल्या क्षुधेला
त्यांची कुठे वाटे क्षिती ।५
चिमण्याची व गुरांची
आता वर्दळ थांबली
मनाचीही गती तिथे
जागेवर थांबली ।६
अंगण झाले रिते
मनातही काही नाही
दानतीचे कुठे कोणा
आपलेच भागत नाही।७

- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर,
ताळगाव